## निवडक



गिमोणे : श्री शांतादुर्गा कलशाचे आगमन झाल्यानंतर पुष्पहार अर्पण करून पुष्पवृष्टी करण्यात आली.

### पिळगाव येथील शांतादुर्गाच्या शिखर कलश स्थापनेला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** पिळगाव येथील स्वयंभू श्री शांतादुर्गा पुनर्प्रतिष्ठापना सोहळा गुरुवार १३ ते मंगळवार दि. १८ पर्यंत होणार असून भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. १३ रोजी ग्रामदेवता श्री शांतादुर्गा कलशाचे वाजत गाजत दिंडी काढून आगमन झाले. गावातील संलग्न सर्व पंचायतन स्थळी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी श्रीराम मंदिर गिमोणे प्रांगणात पुजारी रत्नाकर गर्दे यांनी कलशाला पुष्पहार अर्पण केला व उपस्थितांनी पृष्पवृष्टी केली.महिलांनी कलशाचे औक्षण केले. यावेळी गावकर मंडळी तसेच ग्रामस्थांची उपस्थिती होती. सोमवार दि. १७ रोजी सकाळी ९ वाजता शिखर कलश प्रतिष्ठापना होणार आहे. यानिमित्त दि. मंगळवार दि. १८ पर्यंत भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### हरमल येथे १८ रोजी नामवंत कलाकारांची नाट्य प्रवेश स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १४ :** येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आयोजित शिवजयंती उत्सव सोहळ्यानिमित्त पेडणे तालुका मर्यादित नाट्यप्रवेश स्पर्धा मंगळवार १८ रोजी दुपारी ३.३० वाजता गणेशोत्सव सभागृहात होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी दिली.

या स्पर्धेत पाच संस्थांना प्रवेश दिला आहे. यात ओमकार थिएटर्स प्रस्तुत ड अमित सावंत निर्मित रायगडाला जेव्हा जाग येते, श्री राष्ट्रोळी कलावैभव हरमलतर्फे शंभूराजे, पद्मस्पर्श नाटयसंघ पेडणे तर्फे रायगडाला जेव्हा जाग येते', श्री देवी भगवती क्रीडा व सांस्कृतिक संघ,पेडणेतर्फे व रंगनाथ कलशांवकर निर्मित 'तो मृत्युंजय एक' व दुर्वांकुर कला केंद्रतर्फे 'इथे ओशाळला मृत्यू' नाट्यप्रवेश सादर केले जातील. या स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा दुपारी ३ वाजता प्रमुख पाहुणे निवृत्त शिक्षक दादू परब व खास निमंत्रित पोलीस निरीक्षक विश्वजित चोडणकर तसेच सरपंच संतान फर्नांडिस व पंच सदस्य उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, १८ व १९ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता प्रख्यात कीर्तनकार कैलास खरे, मुंबई यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन संघर्षावर आधारित कीर्तन होईल. तत्पूर्वी १९ रोजी संध्या ३ वा हरमल मर्यादित ८ ते १६ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी वेशभूषा सादरीकरण होईल,त्यात फक्त १५ मुलांना संधी दिली जाईल. अधिक माहितीसाठी संपर्क ८८८८५५४९६६ साधावा असे कळविले आहे. दरम्यान, पेडण्यातील नामवंत कलाकारांचा, ऐतिहासिक अभिनय पाहण्याची संधी संस्थेने उपलब्ध केली असून, तालुक्यातील नाट्य प्रेमींनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी दिली.

### सम्राट क्लब पर्वरीतर्फे २२ रोजी अखिल गोवा सवेश नाट्य गीत स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १४ :** सम्राट क्लब पर्वरीतर्फे दि. २२ रोजी दुपारी ३.३० वाजता श्रीराम वडेश्वर संस्थान पर्वरी येथे अखिल गोवा सवेश नाट्य गीत स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस रु. ८००० दुसरे बक्षीस रुपये सात हजार तृतीय बक्षीस रु. ६००० प्रथम उत्तेजनार्थ बक्षीस रु. दोन हजार दुसरे उत्तेजनार्थ बक्षीस रुपये दोन हजार ठेवण्यात आले आहे अधिक माहितीसाठी तातू कुडाळकर ९९२२२९४२४६ किंवा अध्यक्ष सम्राट रिया राणे ९४२३८८९२८१ यांच्याशी संपर्क साधावा. नाट्यगीत स्पर्धात पंधरा वर्षावरील कोणीही स्पर्धक भाग घेऊ शकतात प्रवेश पत्रिका पाठवण्याची शेवटची अंतिम तारीख १९ फेब्रुवारी असून भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी चार मिनिटांचा व्हिडिओ पाठवायचा आहे .

### हरमल गणेशोत्सव समितीतर्फे आज भव्य शिवजयंती रॅली

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १४ :** येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव समितीतर्फे शिवजयंती २०२५ सोहळा शनिवार दि. १५ रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी बैठकीनंतर दिली. या दिवशी दुपारी ३ वाजता शिव रॅलीस गणेशोत्सव सभागृहाकडून प्रारंभ होईल. रॅलीच्या अग्रभागी रथावर आरूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेषात मंडळाचे उपसचिव दत्तराज (राजू) गावडे असतील. सदर रॅली पालये, कोरगाव, तिठा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण होईल. नंतर नर्सेवाडा मार्गे देऊळवाडा हरमल व मिठागर मार्गे गणेशोत्सव सभागृहाकडे विसर्जित होईल. त्याठिकाणी चहापान व नंतर रॅलीची सांगता होईल. तरी युवकांनी आपल्या दुचाकीसह रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष संतोष कोर कणकर यांनी केले आहे. तरी शिवप्रेमी स्त्री पुरुष व युवकांनी सहभागी होऊन उपकृत करावे. अशी विनंती आयोजक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने केले आहे.

### विकास हायस्कूलची वार्षिक सहल उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १४ :** वळपे पेडणे येथील विकास हायस्कूलची वार्षिक सहल म्हाळसा नारायणी वेर्णा मंदिरात भेट घेतली .सदर सहलीत हायस्कूलचे मुख्याध्यापक नागेश गोसावी, शिक्षक प्रतिनिधी रत्नाकर राव, अन्यशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी म्हाळसा नारायणी हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हाळसाकांत व्यंकटेश देशपांडे उपस्थित होते. त्याने मंदिराचा पूर्ण इतिहास मुलांसमोर माडताना पोर्तुगीजांनी गोव्यावर केलेल्या अत्याचारावर भाष्य केले व कशाकशा प्रकारच्या हालअपेष्टा आपल्या पूर्वजांनी भोगल्या ते सांगितले. पोर्तुगीजामुळेच आपली पवित्र मंदिरे वेगवेगळ्या ठिकाणी हालवावी लागली. वरण्यपुरी म्हणजेच वेर्णा येथे असलेले म्हाळसा मातेचे मंदिर विध्वस्त केल्यावर ती मूर्ती फोंडा तालुक्यातील मारडोळ या गावात हालवली. अशाप्रकारे गोव्यातील अनेक मंदिरातील मूर्ती हिंदू राज्यामध्ये पळवाव्या लागल्या त्यापैकीच काही उदाहरणे म्हणजे मार्सेल ची शांतादुर्गा माता धारगळ हलवण्यात आले, थीवी शिरसाईची श्री महालक्ष्मी धारगळला हलवले, कळंगुटची शांतादुर्गा नानोडा हलवावे लागले. चिंबलची चिमुल करीन मार्सेल न्हावी लागले, अशा प्रकारची शेकडो उदाहरणे गोव्यात असल्याचे त्यांनी सांगितले. गोव्यामध्ये फक्त तीन तालुक्यावर पोर्तुगीजांची सत्ता होती ती म्हणजे तीसवाडी, सासष्टी आणि बार्देश सनातन धर्माचे अतोनात नुकसान धर्म छळ करून या पोर्तुगीसानी केले. अनेक गोवेकरांना आपली गाव सोडून शेजारची राज्ये कर्नाटक व महाराष्ट्रातल्या अनेक भागांमध्ये आश्रय घेतला म्हणून आजही कारवार, बेळगाव या भागात गोवेकरांच्या वस्त्या आपल्याला पाहायला मिळतात. या सर्व देवतांचे जेव्हा वार्षिक उत्सव असतात तेव्हा ही सगळी मंडळी त्या उत्सवाला न चुकता किमान वर्षातून एकदा तरी या मंदिरांना भेट देतात, असे देशपांडे सर म्हणाले. ते पुढे म्हणाले की, आपल्या या पवित्र हिंदू संस्कृतीचे आणि सनातन धर्माचे जर रक्षण करायचे असेल तर आपण सर्वांनी जागृत होऊन हे पवित्र कार्य आपल्याला करावे लागेल. विकास हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री नागेश गोसावी याने श्री. देशपांडे सरांचे आभार मानून हा कार्यक्रम आटोपता घेण्यात आला. त्यानंतर सर्वजण पणजी येथे चिल्ड्रन पार्क भेट देण्यासाठी निघाले तीथे भोजन करून सायंकाळी मिरामार पवित्र अशा आपल्या समुद्रकिनारी भेट देऊन घरी परतले.

# ॲश्ले गार्डनर, बेथ मुनी दमदार अर्धशतके

## गुजरातचे बंगळुरूसमोर २०२ धावांचे लक्ष्य : महिला प्रिमिअर लीग

**बंगळुरू, दि. १४ :**

महिला प्रीमियर लीगच्या पहिल्याच सामन्यात कर्णधार ॲश्ले गार्डनर (७९*) आणि बेथ मुनी (५६) यांनी केलेल्या शानदार अर्धशतकांच्या जोरावर गुजरात जायंट्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू २०२ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. गुजरातने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ५ बाद २०१ धावांचा डोंगर उभारला आहे.

या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची कर्णधार स्मृती मानधना हिने टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. गुजरातची सुरुवात चांगली झाली. वॉलवार्ड आणि बेथ मुनी यांनी पहिल्या विकेटसाठी ४.३ षटकात ३६ धावा जोडल्या. पण लॉरा वॉलवार्ड बाद झाल्यानंतर दयालन हेमलता काही करू शकली नाही. ती लवकर बाद झाली.

पण बेथ मुनीने आपली फटकेबाजी सुरुच झाली. चौथ्या क्रमांवार कर्णधार शले गार्डनर फलंदाजीस आली होती. तिने आणि बेथ मुनीने आरसीबीच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. बेथ मुनी ४२चेंडूत ५६ धावा करून बाद झाली. तिने आपल्या खेळीत ८ चौकार मारले. मुनी बाद झाल्यानंतर ॲश्ले गार्डनरने तुफानी फलंदाजी सुरु केली. तिने अवघ्या ३७ चेंडूत



७९ धावांचा पाऊस पाडला. या खेळीत तिने ८ षटकात आणि ३ चौकार मारले. ती शेवटपर्यंत नाबाद राहिली. शेवटच्या षटकात हरलीन देओलने सलग २ चौकार मारत धावसंख्या २०० च्या पुढे नेली. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून रेणुका सिंगने २ तर कनिका आहुजा, जॉर्जिया वेरहॅम आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# एकदिवशीय मालिकेत श्रीलंका विजेता

**कोलंबो, दि. १४ :**

एकदिवसीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाला २८२ धावांचे लक्ष्य दिले. शुक्रवारी, श्रीलंकेच्या संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आणि ५० षटकांत ४ गडी गमावून २८१ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा संघ २४.२ षटकांत १०७ धावांत सर्वबाद झाला. कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि ग्लेन मॅक्सवेल क्रीजवर आहेत.

श्रीलंकेच्या संघाकडून कुसल मेंडिसने ११५ चेंडूत १०१ धावांची शतकी खेळी केली. निशान मदुष्काने ७० चेंडूत ५१ धावा केल्या आणि चारिथ अस्लंकाने ६६ चेंडूत नाबाद ७८ धावा केल्या. जानिथ लियानागेने नाबाद ३२ धावांचे योगदान दिले.

ऑस्ट्रेलियन संघाचे सुरुवातीचे अपयश

२८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाला

**ऑस्ट्रेलियाला १७४ धावांनी हरले : कुसल मेंडिसचे शतक**

सुरुवातीलाच अपयश आले आहे. संघाने ३३ धावांत ३ विकेट गमावल्या आहेत. सलामीवीर मॅथ्यू शॉर्ट २, जॅक फ्रेझर-मॅकगर्क ९ आणि ट्रॅव्हिस हेड १८ धावांवर बाद झाले. तिघांनाही असिता फर्नांडोने बाद केले.

**सुरुवातीच्या अपयशातून सावरले मदुष्का-मेंडिस**

नाणेफेक जिंकल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेने १५ धावांवर पथुम निस्सांकाची विकेट गमावली. तो ६ धावा करून बाद झाला. त्याला आरोन हार्डीने बोल्ड केले. येथून, सलामीवीर निशान मदुष्का आणि कुसल मेंडिस यांनी संघाला सुरुवातीच्या पराभवातून सावरण्यास मदत केली. मदुष्का ५१ धावा करून बाद झाला. बेन द्वारशुइसच्या चेंडूवर ॲडम झंपाने त्याला झेलबाद केले.

# पर्ये शाळा समूहाचे वार्षिक स्नेहसंमेलन, बक्षीस वितरण उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १४ :** शाळा समूह पर्ये - सत्तरीचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालय पर्येच्या सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सत्तरी तालुक्याचे भागशिक्षणाधिकारी भालचंद्र भावे, तसेच भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यशवंत सावंत, प्रमुख वक्ते म्हणून सत्तरी को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे माजी चेअरमन ॲड. यशवंत गावस, अध्यक्ष म्हणून श्री भूमिका माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिवाकर पोसनाईक, पर्ये ग्रामपंचायतीच्या सरपंच दीपा यशवंत नाईक, पंचसदस्य विदिशा गोसावी, केरी पंचायतीच्या पंचसदस्य नंदिता गावस, पर्ये शाळा व्यवस्थापन



पर्ये : शाळा समूहाच्या बक्षीस वितरण व स्नेहसंमेलन प्रसंगी भालचंद्र भावे, यशवंत सावंत, ॲड. यशवंत गावस, दिवाकर पोसनाईक, दीपा नाईक, विदिशा गोसावी, नंदिता गावस, मुकुंद सावंत, उमा केळकर, गीता केरकर, गोविंद गावस व शिक्षकवर्ग.

समितीचे अध्यक्ष मुकुंद सावंत, सरकारी प्राथमिक विद्यालय पर्येच्या मुख्याध्यापिका सौ.उमा केळकर,समूहाच्या सचिव गीता केरकर, पर्येचे सीआरपी गोविंद गावस उपस्थित होते.

यावेळी सत्तरी तालुक्याचे भागशिक्षणाधिकारी भालचंद्र भावे यांचा सत्कार यशवंत सावंत व ॲड. यशवंत गावस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी श्री. भावे यांनी मुलांना व्यवहारिक ज्ञान कसे द्यावे याविषयी पालकांना विविध गोष्टींतून सांगितले. विद्यार्थी घडत असताना त्यांच्यावर आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम होतो त्यामुळे त्यांच्यावर योग्य संस्कार करा चांगल्या संगतीत ठेवा असे ते म्हणाले.

दिवाकर पोसनाईक यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले. प्रास्ताविक उमा केळकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख अर्जुन गावस यांनी केली. अहवाल वाचन प्रसन्ना माईणकर, बक्षीस वितरणचे सूत्रसंचालन चुडामणी गावस, क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण तृप्ती म्हापसेकर यांनी केले. गीता केरकर यांनी सत्कारमूर्तींचा परिचय केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना भाटवडीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन रजनी गावस यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओंकार वझे व दीप्ती पेडणेकर यांनी केले.

# 'अभ्यासाबरोबर शारीरिक शिक्षणाची गरज'

**आवयन डिसा यांचा सत्कार**

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १४ :** वेर्णेच्या फादर आग्नेल उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षकांतर्फे शारीरिक शिक्षण शिक्षक आवयन डिसा यांचा सत्कार शारिरीक शिक्षणाचा अभ्यासक्रम जगभरात वेगवेगळ्या रितीने विद्यालयात शिक्षक विद्यार्थानां देतात.

विद्यालयात अभ्यासाबरोबर शारीरिक शिक्षण विद्यार्थ्याला देण्याची गरज असते. वेगवेगळे मैदानी खेळ फुटबोल, वोलीबोल, बास्केटबोल, क्रिकेट, थ्रोबोल तसेच बुद्धिबळ, कॅरम, योगासने, व्यायाम, प्राणायमचे प्रशिक्षण विद्यालयाच्या वेळापत्रका व्यतिरिक्त विद्यालय सुरू होण्यापूर्वी तसेच संपल्यानंतर विद्यार्थीना घेऊन उन्हात सराव घेतात व पारितोषिके मिळवतात व विद्यालयाचे नाव उज्वल करतात. असेच कष्ट घेऊन मोठ्या उत्साहाने विद्यार्थाना शारीरीक शिक्षणाची गोडी लावणारे आमचे शिक्षक आयवन डिसा मागील २७ वर्षे



वेर्णा : आवयन डिसा यांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना अमिता मोहनन. बाजूस उपप्राचार्य विवेक रॉड्रिगीस, शारीरिक शिक्षण शिक्षक आयवन डिसा व प्राचार्य ब्रुनो काव्हॉलो.

वेर्णेच्या फादर आग्नेल शिक्षण संस्थेच्या फादर आग्नेल उच्च माध्यमिक विद्यालयांत विद्यार्थाना शिक्षण देत आज सेवानिवृत होतात. देव त्याचे पुढील आयुष्य सुखी, समाधानी व निरोगी राहो असेजीवशास्त्राच्या शिक्षिका अमिता मोहनन हिने सत्कार सुवाळ्यात शिक्षकांना सांगितले.

आग्नेल शिक्षण संस्थेचे संचालक फादर आग्नेलो गोम्स, व्यवस्थापक फादर आयझॅक फर्नांडिस यांनी आयवन सरांचे विद्यार्थ्यांवर असलेले प्रेम, आपुलकीबद्दल तसेच विद्यालयाला वेगवेगळ्या स्पर्धा जिंकून पारितोषिके आणल्याबद्दल अभिनंदन करीत त्यांचे निवृत्त जीवन सुखी राहो, असे म्हटले. उपास्थित सर्व शिक्षकांनी त्यांचे निवृत्ती जीवन आनंदमय राहावे, अशी देवाकडे प्रार्थना करीत त्यानां आशिर्वाद दिले. भूगर्भशास्त्राचे शिक्षक चारुदत्त कामत यांनी आयवन डिसा यांची वैयक्तिक तसेच कौटुंबिक जीवनाची माहिती दित त्यांनी वेगवेगळ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात भाग घेऊन अधिकाऱ्यांना तसेच विद्यार्थांना केलेले मार्गदर्शन, मदत, वेगवेगळ्या शारीरिक शिक्षण कार्यशाळेतील त्यांचा सहभाग, मैदानी खेळातील पंचची भूमिका, क्रीडा विज्ञानावर झालेली राष्ट्रीय परिषदेत त्यांचा सहभाग, क्रीडा प्रशिक्षण अभ्यासक्रम, यावर माहिती शिक्षकांना दिली.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य बुनो काव्हॉलो, उपप्राचार्य विवेक रॉड्रिगीस, शारीरीक शिक्षक आयवन डिसा व शिक्षका अमिता मोहनन हजर होत्या. प्राचार्य बुनो काव्हॉलो यांनी २७ वर्षे विद्यार्थांमध्ये रमून विद्यार्थांना वेगवेगळ्या खेळाबद्दलची माहिती, खेळांचे नियम, खेळाडूंबरोबर सराव, राज्यस्तरीय स्पर्धा जिंकण्यासाठी घेतलेले परिश्रम अशी कामे निस्वार्थीपणाने केल्याबद्दल तांचे विशेष कौतुक करीत अभिनंदन केले व त्यांचा सत्कार केला. उपप्राचार्य विवेक रॉड्रिगीस यांनी शिक्षकांचे उपकार मानले.



# प्रोग्रेस हायस्कूल मुलींचा क्रिकेट संघ राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी पात्र

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १४ :** प्रोग्रेस हायस्कूल साखळीच्या १७ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट संघाने जिल्हा पातळीवरील क्रिकेट स्पर्धेत डिचोली येथील अवर लेडी ऑफ ग्रेस हायस्कुलच्या संघाचा पराभव करत राज्य पातळीवरील क्रिकेट स्पर्धेत स्थान प्राप्त केले आहे. गोवा सरकारच्या क्रीडा व युवा व्यवहार खात्यातर्फे सदर स्पर्धा म्हापसा पेडे येथील मैदानावर घेण्यात आली होती. प्रोग्रेस हायस्कुलच्या संघाने प्रथम फलंदाजी स्वीकारत १५ षटकात १७० धावा काढल्या. वैदेही शेट हिने नाबाद ५७ धावा, श्रीशा सावळ हिने ४१ धावा तर प्रीती गावकर हिने नाबाद २७ धावा काढल्या. अवर लेडीच्या संघाने १५ षटकात ८ बाद ६४ धावा काढल्या. वैभवी गावडे हिने ३ गडी बाद केले.तर वैदही गावकर हिने २ गडी बाद केले. प्रीती गावकर, आर्या पार्सेकर, मेघना धिमान यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. आणि आता हा संघ राज्य पातळीवरील क्रिकेट सामन्यासाठी निवड झाला आहे.

या संघात अक्षया गावस, श्रीशा सावळ(कप्तान), सान्वी गावस, सावरी शिरोडकर, वैदही शेट, युवल पिकुळकर, प्रीती गावकर, दीपल सावळ, आर्या पार्सेकर, मेघना धिमान, वैभवी गावडे, प्राची च्यारी, भक्ती गावकर, उर्मिला मराठे, हफसाह शेख, दिशा शिरोडकर यांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून शारीरिक शिक्षक प्रसाद सुर्लकर हे आहेत. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.


# केकेआर-आरसीबी यांच्यात सलामीची लढत

## इंडियन प्रीमिर लीग २२ मार्चपासून : २५ रोजी ईडन गार्डन्स स्टेडियमवर अंतिम सामना

**नवी दिल्ली, दि. १४ :**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) चा १८ वा हंगाम शनिवार, २२ मार्चपासून सुरू होत आहे. सुरुवातीचे आणि अंतिम सामने गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) च्या होम ग्राउंड ईडन गार्डन्सवर खेळले जातील. पहिल्या सामन्यात केकेआरचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) शी होईल.

आयपीएलचे संपूर्ण वेळापत्रक १ किंवा २ दिवसांत प्रसिद्ध होऊ शकते. महत्त्वाच्या सामन्यांबद्दल फ्रँचायझी संघांना माहिती देण्यात आली आहे. २०२४ च्या अंतिम सामन्यात कोलकाताने सनरायझर्स हैदराबादला हरवून विजेतेपद जिंकले. यावेळी हैदराबादमध्ये २ प्लेऑफ सामने



खेळवले जातील.

१७ व्या हंगामातील उपविजेता सनरायझर्स हैदराबाद देखील त्यांच्या होमग्राउंड उप्पलपासून त्यांच्या मोहिमेची सुरुवात करेल. त्यांचा सामना २३ मार्च रोजी राजस्थान रॉयल्सशी होईल, हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३.३० वाजता सुरू होईल. गेल्या हंगामातील क्वालिफायर-२ मध्येही दोन्ही संघ आमनेसामने आले होते. हैदराबादने सामना जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला.

आयपीएलमध्ये, सुरुवातीचे आणि अंतिम सामने गतविजेत्या संघाच्या घरच्या मैदानावर खेळले जातात. यावेळीही दोन्ही महत्त्वाचे सामने कोलकात्यातील ईडन गार्डन्स स्टेडियमवर होणार आहेत. अंतिम सामना २५ मे रोजी खेळवला जाईल. क्वालिफायर-२ देखील कोलकाता येथे होणार आहे. क्वालिफायर-१ आणि एलिमिनेटर हे मागील उपविजेत्या एसआरएचच्या होम ग्राउंड हैदराबाद येथे खेळवले जातील.

आरसीबीने गुरुवारीच आपल्या नवीन कर्णधाराची घोषणा केली. १८ व्या हंगामात मध्य प्रदेशचा रजत पाटीदार संघाचे नेतृत्व करेल. केकेआर देखील नवीन कर्णधारासह स्पर्धा खेळेल. या हंगामात माजी कर्णधार श्रेयस अय्यर पंजाब किंग्जकडून खेळेल, त्यामुळे केकेआरला नवीन कर्णधार निवडावा लागेल.

१० संघांच्या घरच्या मैदानांव्यतिरिक्त, सामने गुवाहाटी आणि धर्मशाळा येथेही खेळवले जातील. गुवाहाटी हे राजस्थान रॉयल्स (ठठ) चे दुसरे होम ग्राउंड आहे, संघ येथे २ सामने खेळेल. संघ २६ मार्च रोजी कोलकाता आणि ३० मार्च रोजी चेन्नईशी येथे सामना करेल. धर्मशाळा हे पंजाब किंग्ज (झइघड) चे दुसरे होम ग्राउंड आहे. संघ येथे ३ सामने खेळेल. १० संघांचे उर्वरित होम ग्राउंड अहमदाबाद, मुंबई, चेन्नई, बेंगळुरू, लखनऊ, मुल्लानपूर, दिल्ली, जयपूर, कोलकाता आणि हैदराबाद आहेत. हंगामातील उर्वरित सामने येथे खेळवले जातील. या स्पर्धेत १० संघांमध्ये एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत.

आयपीएल ही भारतातील एक फ्रँचायझी क्रिकेट स्पर्धा आहे. दरवर्षी मार्च ते मे दरम्यान टी-२० स्वरूपात हा सामना खेळला जातो. २००८ मध्ये ८ संघांसह त्याची सुरुवात झाली. अंतिम सामन्यात चेन्नईचा पराभव करून राजस्थानने पहिल्या हंगामाचे विजेतेपद जिंकले.

२०२२ मध्ये, या स्पर्धेत १० संघांचा समावेश होता, तेव्हापासून फक्त १० संघांनी सतत सहभाग घेतला आहे. चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांनी सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी ५ जेतेपदे जिंकली आहेत. कोलकाता हा स्पर्धेतील तिसरा सर्वात यशस्वी संघ आहे, ज्याने ३ जेतेपदे जिंकली आहेत. दिल्ली, बेंगळुरू, पंजाब आणि लखनौ यांनी आतापर्यंत एकही विजेतेपद जिंकलेले नाही.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 163 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .